**रयत शिक्षण संस्थेचे,**

# चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२३-२४

**कार्यक्रम अधिकारी : प्रा. डॉ. श्रीमती एस. जे. माने**
**प्रा. डॉ. आय. एच. मुल्ला**

- **शिबिर ठिकाण : मौजे इंगळी**
- **कालावधी : दि. ०४/०१/२०२४ ते दि. १०/०१/२०२४**
- **सहभागी स्वयंसेवक : १०० (मुले : , मुली : )**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम सत्रात राष्ट्रीय सेवा योजना विभाग मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत झाला. या विभागात एकूण २ युनिट (२०० स्वयंसेवक) आहेत. यातील एक युनिट (१०० स्वयंसेवक) हे विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी निवडले जाते. या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरातून स्वयंसेवकांना समाजामध्ये राहून नेमक्या गाव पातळीवरील समस्या, जबाबदाऱ्या काय आहेत याची जाणीव होऊन त्यादृष्टीने त्यांचे व्यक्तित्व विकसित करणे आणि श्रमदानातून, बौध्दिक व्याख्यानातून तसेच वेगवेगळ्या उपक्रमातून स्वत:चा तसेच समाजाचा आत्मविश्वास विकसित करण्यासाठी व विकास करण्यासाठी प्रयत्न या श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून केला जातो.

यास अनुसरुन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मौजे इंगळी गावात दि.०४/०१/२०२४ ते दि. १०/०१/२०२४ या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. या शिबीरातील घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांचा अहवाल पुढीलप्रमाणे :-

- **गुरुवार दि. ०४ जानेवारी २०२४** : रोजी उद्‌घाटन संमारंभाचे आयोजन करण्यात आले होते. उद्‌घाटक म्हणून मान.प्रा.डॉ. एच. एस. वनमोरे (माजी समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मान. श्री. दादासाहेब मोरे (सरपंच, ग्रामपंचायत, इंगळी) यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या अगोदर स्वयंसेवकांनी निवासी ठिकाणी तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणची स्वच्छता, पाणी व्यवस्था केली.
- **शुक्रवार दि. ०५ जानेवारी २०२४** : रोजी गावातील रस्ते स्वच्छता केली. व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा. श्री. बाबासाहेब नदाफ (सामाजिक कार्यकर्ते, हेरवाड) यांनी "बलशाली भारतासाठी बलशाली युवक " या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. डॉ. संतोष बराले यांनी भूषविले. यावेळी सौ. सुमैया नायकवडे (उपसरपंच, इंगळी ग्रा.पं.), श्री. अमृत वेताळे (सदस्य, ग्रा. पं. इंगळी), हे प्रमुख उपस्थित होते. व्याख्यानानंतर सायंकाळी राष्ट्रीय शांतता, एकात्मता मेणबत्ती रॅली गावातून काढण्यात आली. तसेच रॅलीचा समारोप गावातील मुख्य चौकात क्रांतीकारी गीते म्हणून झाली.

- **शनिवार दि. ०६ जानेवारी २०२४** : इंगळी येथील गावच्या प्रवेशद्वारापासून रस्ता, गटार स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. त्याचबरोबर गावातील बिरोबा मंदिर परिसर, प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची संपूर्ण स्वच्छता यावेळी करण्यात आली. प्रबोधनपर व्याख्यानमालेत मा. डॉ. विवेक कोतेकर (कार्पोरेट ट्रेनर, कोल्हापूर) यांचे "सर्वांगिण विकासासाठी समृद्धीची मानसिकता" या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. अरुण शिंगे हे होते. यावेळी मा. सौ. स्वप्नाली भातमारे, मा. श्री. शिवाजी चौगुले (सदस्य, ग्रा.पं. हुपरी) हे प्रमुख उपस्थित होते. व्याख्यानानंतर स्वच्छता आणि जल व्यवस्थापन जनजागृती फेरी गावातून काढण्यात आली. तसेच 'मतदान - माझी जबाबदारी' या विषयावर प्रबोधनात्मक पथनाट्य सादरीकरण हे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी गावातील चौकाचौकात केले.
- **रविवार दि. ०७ जानेवारी २०२४** : मौजे इंगळी येथील विविध मंदीर परिसर हे पाण्याने धुवून स्वच्छ करून मंदीरांशेजारील परिसर स्वयंसेवकांनी स्वच्छ केला. प्रबोधनात्म कार्यक्रमात मा. श्री. किरण कांबळे (मुख्य शेती अधिकारी, जवाहर साखर कारखाना, हुपरी) यांचे 'आधुनिक शेती संवर्धन' याविषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. प्रा. एस. ए. भंडारे यांनी भूषविले यावेळी मा. सौ. चंद्रकला मगदुम, मा. सौ. आक्काताई बिरांजे (सदस्या, ग्रा. पं. इंगळी) हे प्रमुख उपस्थित होते. यानंतर सायंकाळी गावातील मुख्य चौकात 'निसर्ग वाचवा - पृथ्वी वाचवा' या विषयावर लघुपट सादरीकरण करण्यात आले. या लघुपट सादरीकरणासाठी मा. श्री. आकाश बिरांजे (रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर) यांचे विशेष सहकार्य लाभले.
- **सोमवार दि. ०८ जानेवारी २०२४** : रोजी गावाबाहेर असणाऱ्या स्मशानभूमीची तसेच गावात असणाऱ्या कब्रस्थानची स्वच्छता तसेच गावाबाहेरील पंचगंगा नदी घाट स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा. प्रा. डॉ. संभाजी गावडे (विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, एस.जी.एम. कॉलेज, कराड) यांचे "जलव्यवस्थापन : काळाची गरज " या विषयावर संवादात्मक व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. प्रा. डी. सी. तुळशीकट्टी यांनी भूषविले. यावेळी मा. श्री. युवराज चव्हाण, मा. सौ. सुरेखा नाईक (सदस्य, ग्रा.पं. इंगळी) या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित होते. दुपारच्या सत्रात आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबीरामध्ये स्वयंसेवक व ग्रामस्थांची मधुमेह तसेच एच.आय.व्ही. आरोग्य तपासणी करण्यात आली. या आरोग्य शिबीरासाठी एज्युकेशन सोसायटी, गारगोटी संचलित मनोबल लिंक वर्कर प्रकल्प कोल्हापूर व जिल्हा एड्स नियंत्रण पथक, सी.पी.आर., कोल्हापूर यांचे सहकार्य लाभले. संध्याकाळच्या सत्रात 'युवक आणि व्यसन' या विषयावर स्वयंसेवकांमध्ये गटचर्चा घेण्यात आली.
- **मंगळवार दि. ०९ जानेवारी २०२४** : रोजी शाहू नगर, बेघर वसाहत, संभाजी नगर अशा माळभागावरील परिसराची स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. प्रबोधनात्मक कार्यक्रमात मा. प्रा. डॉ. व्ही. जे. माने (यशवंतराव चव्हाण समाजकार्य महाविद्यालय, सातारा) यांचे "स्वच्छ भारत- स्वस्थ भारत " या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. प्रा. एम. एस. मुजावर यांनी भूषविले तर मा. सौ. इर्शाद नायकवडे व मा. श्री. मियालाल पटेल (सदस्य, ग्रा.पं. इंगळी) या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित होते. यावेळी प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याचे उद्‌घाटन मा. श्री. किशोर शिंदे (पोलीस निरीक्षक, हुपरी पोलीस स्टेशन) यांनी केले. यावेळी स्वयंसेवकांनी प्रबोधनात्मक विविध कला प्रकार सादर केले.
- **बुधवार दि. १० जानेवारी २०२४** : रोजी प्राथमिक मराठी कुमार व कन्या शाळा परिसर, मैदान स्वच्छता, अंगणवाडी परिसर स्वच्छता, सार्वजनिक पाण्याची टाकी व परिसर स्वच्छता, गाताडे हायस्कूल, इंगळी

येथील स्वच्छता करण्यात आली. शिबीराचा शेवटचा दिवस असल्याने समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा. डॉ. तानाजी चौगुले (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) तर अध्यक्ष म्हणून मा. प्रा. डॉ. सुरेश आपटे (सायबर कॉलेज, कोल्हापूर) हे लाभले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले, सरपंच मा. श्री. दादासाहेब मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

अशाप्रकारे विविध उपक्रमाचे आयोजन या शिबीरात करण्यात आले. या विशेष श्रमसंस्कार शिबीरास महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील सदस्य प्रा. बी. बी. जाधव, प्रा. के. आय. मुल्लाणी, प्रा. एम. एल. सोनटक्के, तसेच सर्व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचे सहकार्य या शिबीरास मिळाले. इंगळी येथील सरपंच मा. श्री. दादासाहेब मोरे, ग्रामविकास अधिकारी मा. श्री. एस. बी. हसुरे,  सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालयीन सेवक, इंगळी येथील तरुण मंडळे, विकास सेवा सोसायटी, दुध संस्था, क्रिडा व शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक मंडळे, महिला बचत गट व सर्व ग्रामस्थ यांचे अनमोल सहकार्य मिळाले. महाविद्यालयातील सर्व आजी-माजी विद्यार्थी व शिबीरातील सर्व सहभागी स्वयंसेवकांचे मौल्यवान सहकार्याने हे शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाले.